श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान
तुळजापूर,जि.धाराशिव (महाराष्ट्र)-४१३ ६०१
दूरध्वनी : ०२४७१ - २४२०३१
Shri Tuljabhavani Temple Trust
Tuljapur, Dist. Dharashiv (Mah.) - 413 601
Tel. : 02471 - 242031
Web Site: https://www.shrituljabhavani.org E-mail : shreetuljabhavanitemple@gmail.com
ISO : 9001 : 2008

जा.क्र.:- श्रीतुभमंसंतु/2026-27/भांडार/सी.आर.19/ 1474 दिनांक :- 04 /08 /2026

# परिपत्रक

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर मध्ये श्रीदेविजींचा शारदीय नवरात्र महोत्सव, चैत्र पौर्णिमा यात्रा तसेच संपूर्ण वर्षभर भाविकांचे सोईसुविधेकरिता लागणारे दिशादर्शक, सूचनात्मक, मार्गदर्शनपर विविध आकाराचे डिजीटल बोर्ड लोखंडी फ्रेमसह, ॲक्रेलिक (Acrylic) बोर्ड व पत्र्याचा बोर्ड तयार करुन सांगितलेल्या ठिकाणी बसवून देणे व पुरवठा करणेकरिता इच्छूक पुरवठाधारकांकडून सीलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत. आपले सीलबंद दरपत्रक दिनांक 06 / 08 /2026 ते दिनांक 13 / 08 /2026 पर्यंत तहसिलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन), श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांचे नावे मंदिर संस्थान प्रशासन कार्यालयातील मध्यवर्ती आवक जावक विभागात कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

| अ.क्र. | तपशील | परिमाण | जी.एस.टी. सह दर |
|---|---|---|---|
| 1) | भाविकांच्या सोईसुविधेकरिता लागणारे दिशादर्शक, सूचनात्मक, मार्गदर्शकपर विविध आकारचे डिजीटल बोर्ड लोखडी फ्रेमसह तयार करुन सांगितलेल्या ठिकाणी बसवून देणे. (सदरील तयार करण्यात येणारे डिजीटल बोर्ड लोंखडी फ्रेमसह तयार करुन पुरवठाधारकाने स्वत:च्या मनुष्यबळाचा व वाहनाचा वापर करुन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान व प्रशासन यांच्या सूचनेनुसार सांगितलेल्या ठिकाणी बसवून देणे बंधनकारक राहील.) | प्रति चौरस मीटर | |
| 2) | ॲक्रेलिक (Acrylic) बोर्ड तयार करुन सांगितलेल्या ठिकाणी बसवून देणे. | प्रति चौरस मीटर | |
| 3) | लोखंडी ॲंगल फ्रेमसह (Iron Angle Support), उच्च दर्जाच्या रंगाने अक्षरासहीत पूर्णत: (With High-quality Paint) रंगवलेला गेजप्रमाणे पत्र्याचा बोर्ड (Sheet Metal Board) स्थायी स्वरुपात / कायमस्वरुपी (Permanently) मजबूतीने बसवून देणे. | प्रति चौरस मीटर | |

➤ **अटी व शर्ती** :-

1) सीलबंद दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी दुपारी 05:00 वाजेपर्यंत तहसिलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांचे कार्यालयात उपस्थित पुरवठाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष अथवा पश्चात उघडण्यात येतील.
2) सादर केलेले दर मंजूर झाल्यापासून एक वर्षापर्यंत ग्राह्य धरले जातील.
3) पुरवठाधारकांनी साहित्याचा पुरवठा करतेवेळी देयकासोबत पॅन कार्ड देणे आवश्यक आहे.
4) पुरवठाधारकांने आपले दर हे जी.एस.टी., आयकर व इतर अनुषंगिक करांसह द्यावयाचे आहेत.
5) पुरवठाधारकाने दरपत्रक सादर करतेवेळी जी.एस.टी. नोंदणी क्रमांक देणे आवश्यक आहे.
6) पुरवठाधारकाने देयक हे टॅक्स इन्व्हाईस स्वरुपात देणे बंधनकारक राहील.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान
तुळजापूर, जि.धाराशिव (महाराष्ट्र)-४१३ ६०१
दूरध्वनी : ०२४७१ - २४२०३१

Shri Tuljabhavani Temple Trust
Tuljapur, Dist. Dharashiv (Mah.) - 413 601
Tel. : 02471 - 242031

Web Site: https://www.shrituljabhavani.org E-mail : shreetuljabhavanitemple@gmail.com

ISO : 9001 : 2008

7) एक वर्षांत कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार मंजूर दराप्रमाणे डिजीटल बोर्ड लोखंडी, ॲक्रेलिक (Acrylic) बोर्ड व पत्र्याचा बोर्ड फ्रेमसह तयार करुन वेळेत पुरवठा न केल्यास तहसिलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन), श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर हे सरकारी नियमाप्रमाणे आकारतील तो दंड भरणे निविदाधारकावर बंधनकारक असले.
8) कमी प्रतिचे अथवा निकृष्ठ दर्जाचे साहित्य पुरवठा केल्याचे आढळून आल्यास त्यांचे देयक अदा करण्यात येणार नाही.
9) आराधवाडी पार्कींग, कार पार्कींग वाहनतळ, घाटशीळ रोड पायऱ्या व वर यै-जा करणेचा मार्ग, मंदिर व मंदिर परिसर, शहरातील विविध चौक, नवीन व जूने बसस्थानक, महाद्वार परिसर, बीडकर पायऱ्या व इतर महत्त्वाचे ठिकाणी मंदिर प्रशासनाने मागणी व सूचना केल्यानुसार व सांगितल्यानुसार दिशादर्शक, सूचना, माहिती, मार्गदर्शन असणारे विविध आकाराचे डिजीटल बोर्ड लोखंडी फ्रेमसह तयार करुन पुरवठाधारकाने स्वत:चे मनुष्यबळ वापरुन सांगितलेल्या वेळी व सांगितलेल्या ठिकाणी तात्काळ लावून/बांधून/बसवून द्यावे लागतील. त्यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क दिले जाणार नाही. त्यासंबंधित आवश्यक फोन नंबर मंदिर प्रशासनाकडे सादर करावेत.
10) पुरवठाधारकांने मंदिर संस्थानला पुरवठा केलेल्या विविध आकाराचे दिशादर्शक, सूचना, माहिती, मार्गदर्शन असणारे विविध आकाराचे डिजीटल बोर्ड लोखंडी, ॲक्रेलिक (Acrylic) बोर्ड व पत्र्याचा बोर्ड फ्रेमसह तयार करुन पुरवठा न केल्यास, मागणी केलेल्या परिमाणांमध्ये कमी प्रमाण आढळल्यास, प्रिंटींग, डिझाईंन व बॅनरच्या कापडाचा दर्जा व्यवस्थित आढळून न आल्यास सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधारकाची राहील व तहसिलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन), श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर हे ठरवतील त्याप्रमाणे पुरवठाधारकावर कारवाई करण्यात येईल.
11) मागणी केलेल्या माल साहित्याचा पुरवठा मंदिर प्रशासन कार्यालयात करावयाचा आहे. त्याकरिता कोणतेही ॲडव्हान्स रक्कम, मजूरी अथवा वाहतूक खर्च दिला जाणार नाही.
12) मंजूर पुरवठाधारकांचे सर्व देयक हे जी.एस.टी. च्या नियमांनुसार स्वीकारण्यात येतील.
13) निश्चीत केलेल्या दरामध्ये कोणत्याही सबबीवर पुरवठाधारकास वाढ मागता येणार नाही. सदर दरामध्ये वाढ करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.
14) कोणतीही दरपत्रके स्विकारण्याचा अगर नाकारणेचा अधिकार मंदिर संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दल कारण देणे मंदिर संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

(माया माने)
तहसिलदार तथा
व्यवस्थापक (प्रशासन)
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर